(नोंदणी क्रमांक एफ-१३ लातूर)

# दयानंद शिक्षण संस्था, लातूर

"आ नो भद्रा कृतवो यन्तु विश्वतः"

संदर्भ : /2023-24/ दिनांक : 10.07.2023

अध्यक्ष :
लक्ष्मीरमण लाहोटी

उपाध्यक्ष :
अरविंद सोनवणे
ललीतभाई शाह
रमेशकुमार राठी

सरचिटणीस :
रमेश बियाणी

संयुक्त सचिव :
सुरेश जैन

सहाय्यक सचिव :
रामराव पाटील
ॲड. श्रीकांत उटगे

कोषाध्यक्ष :
संजय बोरा

**प्रति,**

**प्राचार्य, दयानंद कला महाविद्यालय, लातूर**
**प्राचार्य, दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर**
**प्राचार्य, दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर**
**प्राचार्या, दयानंद विधी महाविद्यालय, लातूर**
**प्राचार्या, दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालय, लातूर**
**प्राचार्य, दयानंद इंन्स्टिट्युट ऑफ फार्मसी महाविद्यालय, लातूर**
**प्राचार्या, दयानंद इंटेरियर डेकोरेटर महाविद्यालय, लातूर**
**प्राचार्य, दयानंद आर्किटेक्चर महाविद्यालय, लातूर.**

महोदय,

दयानंद शिक्षण संस्था अंतर्गत सर्व महाविद्यालयातील प्राचार्य यांना कळविण्यात येते कि, दयानंद शिक्षण संस्था संचलित सर्व महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या उत्कृष्ट कार्याचा गुणगौरव व्हावा या हेतूने प्रस्तुत शिक्षण संस्थेच्या वतीने प्रतिवर्ष 15 ऑगस्ट दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात आदर्श प्राध्यापक, शिक्षक व उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी यांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. सदर पुरस्काराबाबतची नियमावली व अर्जाचा नमूना संस्था कार्यालयात असून त्याची प्रत सर्व महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

तरी सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्य यांनी आपआपल्या अस्थापनेवरील कार्यरत प्राध्यापक, शिक्षक व प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणुन द्यावे व त्यांचे प्रस्ताव दिनांक 25.07.2023 पर्यंत दयानंद शिक्षण संस्था कार्यालयात सादर करावेत.

**रमेश बियाणी**
**सचिव**

**लक्ष्मीरमण लाहोटी**
**अध्यक्ष**

Scanned with CamScanner

(नोंदणी क्रमांक एफ-१३ लातूर)

# दयानंद शिक्षण संस्था, लातूर

जा.क्र. ____/२०२३-२४/____ दि.  /  /२०२३

दयानंद शिक्षण संस्था संचलित महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, यांच्या पुरस्काराबाबत...

## <u>परिपत्रक</u>

दयानंद शिक्षण संस्था संचलित महाविद्यालयात प्राध्यापक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, यांचे योगदान महत्त्वाचे असते. म्हणूनच त्यांच्या उत्कृष्ट कामाचा गुणगौरव व्हावा, या हेतुने दयानंद शिक्षण संस्थेच्या वतीने प्रतिवर्षी 15 ऑगस्ट दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात आदर्श प्राध्यापक, शिक्षक, उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी पुरस्कार देण्यात येणार आहेत. यासाठी विहीत नमुन्यामध्ये प्राध्यापक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

दयानंद शिक्षण संस्था संचलीत सर्व महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी आपले अर्ज विहित नमुन्यात भरुन आवश्यक त्या कागदपत्रासह 25 जुलै 2023 पर्यंत कार्यालयीन वेळेत निम्नस्वाक्षरी कर्त्याच्या कार्यालयात संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यामार्फत अग्रेषित करुन पाठवावेत. प्राचार्य यांचा अभिप्राय (गोपनीय) बंद पाकीटात स्वतंत्रपणे अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे. उपरोक्त तारखेनंतर प्राप्त अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

उक्त पुरस्काराबाबतची नियमावली, अर्जाचा नमुना संस्था कार्यालयात तसेच सर्व महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध राहील.

**रमेश बियाणी**
**सचिव**

**लक्ष्मीरमण लाहोटी**
**अध्यक्ष**

Scanned with CamScanner

## कनिष्ठ महाविद्यालयीन आदर्श शिक्षकांच्या पुरस्काराचे निकष

**प्रस्तावना :** शिक्षण हा समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या पाया आहे. समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या शिक्षकामुळेच विद्यार्थी ,समाज व राष्ट्राचा विकास होतो. अशा समर्पित वृत्तीने कार्य करणाऱ्या व गुणवत्ता सुधार करणाऱ्या शिक्षकांना शैक्षणिक वर्ष 2023-24 पासून दरवर्षी दयानंद शिक्षण संस्थेत आदर्श शिक्षक पुरस्कारा प्राप्त शिक्षकांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रु.15,000/- देऊन गौरविले जाणार आहे.

आदर्श शिक्षक पुरस्काराचे प्रस्ताव पात्र शिक्षकाकडून ऑफलाईन मागविण्यात येणार आहेत. खाली दिलेल्या मार्गदर्शक निकषानूसार प्रस्ताव सादर करावे. सदरील प्रस्तावाचे अर्ज महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

**प्रस्तावासाठी आवश्यक अटी :**

1. दयानंद शिक्षण संस्थे अंतर्गत येणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयात किमान पाच वर्षे सेवा आवश्यक.
2. शिक्षकांनी पुरस्कारासाठी विहीत नमुन्यात अर्ज करणे आवश्यक.
3. शिक्षकांनी अर्जासोबत सादर केलेले पुरावे प्राचार्यांनी नामनिर्देशनासाठी प्रमाणित करणे आवश्यक
4. शिक्षकांच्या आपल्या सेवा कालावधीतील केलेल्या संपुर्ण सेवेच्या कार्याचे मूल्यमापन समितीकडून गुणांकनाद्वारे करण्यात येईल.
5. सदरील पुरस्कार सेवा कालावधीत एकदाच दिला जाईल.
6. सदरील पुरस्कार अध्ययन, अध्यापन, मूल्यमापन, संशोधन इ. क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या शिक्षकांना प्रदान करण्यात येईल.
7. शिक्षण संस्थेत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रम, अभ्यासक्रमेत्तर उपक्रमात सहभाग.
8. सामाजिक, शैक्षणिक, राज्यस्तरीय, राष्ट्रीय उपक्रमात सहभाग.
9. शिक्षकांचे मागील पाच वर्षाचे गोपनीय अहवाल.
10. शिक्षकांच्या सेवेतील कार्यपध्दती व निर्व्यसनी असले बाबत प्राचार्यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.



Scanned with CamScanner

# निवड प्रकिया

1. शिक्षकांनी पुरस्कारासाठी विहित नमुन्यात अर्ज तयार करुन सदरील अर्ज संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या शिफारशीने अर्ज सादर करावा.
2. सादर केलेल्या अर्जाची छाननी परीक्षण समितीने करुन सदरील शिक्षकास निवड समितीसमोर सादरीकरणास सूचविणे.
3. निवड समिती आलेल्या अर्जाचे परीक्षण करुन पुरस्कारासाठी निवडलेल्या शिक्षकाचे नाव शिक्षण संस्थेकडे सादर करेल.

4.पुरस्कार प्राप्त शिक्षकाचे नाव सर्व प्रकिया पूर्ण झाल्यानंतर जाहीर करण्यात येईल.

5. दरवर्षी 15 ऑगस्ट रोजी सदरील पुरस्कार वितरीत केला जाईल.

6.पुरस्काराचे नामनिर्देशन करण्याचे सर्व अधिकार निवड समितीस असेल.

7. एखाद्या शैक्षणिक वर्षात पुरस्कारास योग्य अर्ज आला नाही तर तो त्या वर्षी दिला जाणार नाही.

8. विहित नमुन्यात, नियमानूसार संबंधीत प्रशासनाकडूनच आलेले अर्ज स्विकारले जातील .

9. निवड समितीकडून अर्जाची छाननी झाल्यानंतर आपणास मुलाखतीस बोलावले जाईल.

10. एखाद्या शैक्षणिक वर्षात पुरस्कारसाठी अर्ज प्राप्त झाला नाही तर संस्थेचे अध्यक्ष एखाद्या शिक्षकाचे नाव सूचवतील.

## गुणदान पध्दत

1. शिक्षकांच्या नियुक्ती दिनांकापासून ते आजपर्यंत केलेल्या शैक्षणिक, संशोधनात्मक सहभागाचा मूल्यमापनात विचार केला जाईल.
2. 90 टक्के गुण हे अर्जासोबत सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या आधारावर दिले जातील. तसेच 10 टक्के गुण मुलाखतीतून दिले जातील.



Scanned with CamScan

# दयानंद शिक्षण संस्था, लातूर
## आदर्श शिक्षक पुरस्कार गुणदान तक्ता

| अ.क्र. | निकष | स्तर निहाय गुण | कमाल गुण |
|---|---|---|---|
| 1 | आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा पुढचा टप्पा प्राप्त केलेल्या शिक्षकांना पुढील प्रमाणे गुण प्राप्त होतील | अधिकची पदव्युत्तर पदवी - 1 गुण<br>सेट/नेट/ गेट - 4 गुण<br>एम.फिल. /पीएच.डी. - 5 गुण | 10 गुण |
| 2 | शैक्षणिक संशोधनपर निबंध/प्रबंध<br>(किमान 05 पाच निबंध/ प्रबंध ) | विद्यापीठ स्तर - 2 गुण<br>राज्यस्तर - 3 गुण<br>राष्ट्रीयस्तर - 5 गुण | 10 गुण |
| 3 | वृत्तपत्र अथवा नियतकालिकात वैचारिक किंवा विश्लेषनात्मक प्रकाशित 2 लेख | जिल्हास्तर -1 गुण<br>राज्यस्तर - 2 गुण<br>राष्ट्रीयस्तर - 3 गुण | 3 गुण |
| 4 | शिकवत असलेल्या वर्गातील त्या त्या अध्यापन विषयाच्या अनुषंगाने विद्यर्थ्यांना विविध क्षेत्रातील प्राप्त पुरस्कार<br>कला/ क्रीडा/ संगीत/नृत्य/भाषा/ गणित/वाणिज्य/ विज्ञान/ सामाजिक शास्त्र/ रासेयो/वक्तृत्त्व/इन्स्पायर अवार्ड इ. | जिल्हास्तर - 1 गुण<br>राज्यस्तर - 2 गुण<br>राष्ट्रीयस्तर - 3 गुण | 3 गुण |
| 5 | शिक्षकाने केलेल्या सामाजिक/ शैक्षणिक/ साहित्यीक/ सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यासाठी/ आपत्ती व्यवस्थापन/ राष्ट्रीय कार्य इ. साठी शासन अथवा शासन पुरस्कृत संस्थेकडून प्राप्त पुरस्कार. | जिल्हास्तर - 2 गुण<br>राज्यस्तर - 3 गुण<br>राष्ट्रीयस्तर - 5 गुण | 5 गुण |
| 6 | शिक्षकाने आपल्या दातृत्वातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी दिलेले आर्थिक योगदान. | रु. 10000/- पर्यंत 2 गुण<br>रु. 25000/- पर्यंत 3 गुण<br>रु. 50000/- पर्यंत - 5 गुण | 5 गुण |
| 7 | ग्रंथ लेखन, संपादक (आयएसबीएन सह प्रकाशित झालेले 2 ग्रंथ) | प्रत्येक ग्रंथास 2 गुण | 4 गुण |
| 8 | ग्रंथास विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात संदर्भ ग्रंथ म्हणून मान्यता . | प्रत्येक ग्रंथास 5 गुण | 5 गुण |



Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 9 | महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळावर समिती सदस्य म्हणून निवड. | 5 गुण | 5 गुण |
| 10 | नवीन अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणात तज्ज्ञ मार्गदर्शक/समन्वयक म्हणून कार्य | मार्गदर्शक म्हणून कार्य 4 गुण<br>प्रशिक्षण समन्वयक - 5 गुण | 5 गुण |
| 11 | संस्थेकडून /महाविद्यालयाकडून निकाल/विविध कार्यासंदर्भात मिळालेली सन्मान/आभार पत्र/इतर सामाजिक उपक्रमामध्ये सक्रीय सहभाग | महाविद्यालय/इतर सामाजिक उपक्रम सन्मानपत्र - 2 गुण<br>संस्था सन्मानपत्र - 3 गुण | 5 गुण |
| 12 | ई-साहित्य निर्मिती करुन ऑनलाईन पोर्टल/ॲप/ वेबसाईट/ युट्युब वर आपल्या विषयाच्या अनुषंगाने स्वत: शैक्षणिक साहित्य निर्मिती करुन अपलोड करण्याचा सहभाग | व्हिडिओ 1 ते 5 - 2 गुण<br>व्हिडिओ 6 ते 10 - 4 गुण<br>व्हिडिओ 11 ते 15 - 6 गुण<br>व्हिडिओ 16 ते 20 - 8 गुण<br>व्हिडिओ 20 व त्याहुन अधिक - 10 गुण | 10 गुण |
| 13 | महाविद्यालयाच्या विविध समित्यावर केलेले कार्य | सलग 5 वर्ष - 4 गुण<br>सलग 10 वर्ष - 7 गुण<br>सलग 15 वर्ष व त्यापेक्षा अधिक- 10 गुण | 10 गुण |
| 14 | महाविद्यालयात दैनंदिन उपस्थिती संदर्भात प्राचार्यांचा अहवाल | उपस्थिती 75% - 3 गुण<br>उपस्थिती 100% - 5 गुण | 5 गुण |
| 15 | मागील 5 वर्षाचे गोपनीय अहवाल मूल्यमापन व मागील 5 वर्षाच्या उपभोगलेल्या वैद्यकीय व किरकोळ रजा | शिल्लक रजेस - 2 गुण<br>उत्कृष्ठ अहवाल - 3 गुण | 5 गुण |

**रमेश बियाणी**
**सचिव**

**लक्ष्मीरमण लाहोटी**
**अध्यक्ष**



Scanned with CamScanner